**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर**
**सोमवार पेठ, हत्तीमहल, गंजी गल्ली, कोल्हापूर - ४१६ ००२**
दूरध्वनी क्र. (०२३१) २५४३८१४, २५४२०६०ईमेल:- dydekop@gmail.comवेबसाईट :- www.dydekop.org

जा.क्र.शिउसं/प्राथ-१/कोवि/प्रतिनियुक्ती पुसेगाव/२०२५/५१५५/ दिनांक- **०५/०६/२०२५**

प्रति,

शिक्षणाधिकारी (प्राथमिक ) जिल्हा परिषद, कोल्हापूर/ सांगली/सातारा/ रत्नागिरी / सिंधुदुर्ग
प्रशासन अधिकारी, म.न.पा./न.पा. /न.प. शिक्षण मंडळे, कोल्हापूर विभाग.

विषय- शासकीय विदयानिकेतन पुसेगाव, ता. खटाव, जि. सातारा येथील शिक्षक पदे प्रतिनियुक्तीने भरणेबाबत

संदर्भ- १) शासन निर्णय दि. १६/२/२०१८
२) शासन पत्र क्रमांक संकीर्ण-२०२५/प्र.क्र.७२/एसएम-६, दि. २७/५/२०२५
३) मा. शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शि.सं.पुणे यांचे पत्र क्र. शिसंमा-२०२४/(एस-५)/ शाविनिपु/ रिक्तपदे/२६५८, दि. ३०/५/२०२५
४) प्राचार्य, शासकीय विदयानिकेतन पुसेगाव यांचेकडील पत्र क्र. शाविनिपु/आस्था/प्रतिनियुक्ती/२०२५/ ७०७-७१०, दि. २/६/२०२५

वरील विषय संदर्भाचे अनुषंगाने या विभागातील शासकीय विदयानिकेतन पुसेगाव, ता. खटाव, जि. सातारा या निवासी शाळेत रिक्त असणारी शिक्षक पदे तातडीने भरावयाची आहेत. सदर प्रतिनियुक्तीवर भरावयाची शिक्षक पदे जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपालिका व नगरपरिषद कडे कार्यरत शिक्षकांचे मधून भरावयाची आहेत. शासकीय विदयानिकेतन ही निवासी शाळा असल्यामुळे शिक्षकांना अध्यापनासोबत वर्गशिक्षक, विविध स्पर्धा परीक्षा जादा तासिका घेणे, विविध उपक्रम राबविणे, दिनप्रमुख- सकाळ व संध्याकाळ अभ्यासिका घेणे, दोनवेळचा नाष्टा व जेवण यांचा टेस्ट रिपोर्ट लिहिणे, कुलशिक्षक- मुलांच्या निवासास रोज भेट देणे, मुलांचे कमी-जास्त पाहणे, त्यांना समुपदेशन करणे, त्यांना आवश्यक असणारे साहित्य खरेदी करुन आणून देणे इ. कामे करावी लागतात. तसेच विदयार्थ्यांचा सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंतचा दिनक्रम ठरवून त्यानुसार दैनंदिन कामकाज करणे, आजारी विदयार्थ्यांवर विशेष लक्ष ठेवणे इ. कामकाज करावे लागते. सदर रिक्त पदावर प्रतिनियुक्त करावयाच्या शिक्षक पदांचा विषयनिहाय तपशिल खालीलप्रमाणे आहे.

विषयनिहाय आवश्यक प्रतिनियुक्त शिक्षक पदांचा तपशील

| अ.क्र. | विषय | आवश्यक शिक्षक पदे | किमान शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|
| १ | मराठी | २ | बी.ए.बी.एड. |
| २ | इंग्रजी | २ | बी.ए.बी.एड. |
| ३ | विज्ञान (सेमी इंग्रजी) | २ | बी.एस्सी.बी.एड. |
| ४ | गणित (सेमी इंग्रजी) | २ | बी.एस्सी.बी.एड. |
| ५ | हिंदी | १ | बी.ए.बी.एड. |
| ६ | सामाजिकशास्त्रे | १ | बी.ए.बी.एड. |
| ७ | क्रीडा शिक्षक | १ | बी.पी.एड. |
| ८ | कला शिक्षक | १ | ए.टी.डी. |
| | एकुण | १२ | |

या प्रतिनियुक्तीने पद भरणेसाठी निवड प्रक्रियेचे वेळापत्रक, या बाबतच्या अटी/शर्ती, त्याचा तपशिल सोबत जोडला आहे. तसेच सदर शिक्षक पदासाठी माहिती भरणेकरीता लिंक खाली दिली असून त्या लिंकवर इच्छुक शिक्षकांनी माहिती भरावयाची आहे. सदर लिंकमध्ये माहिती भरणेची **अंतिम मुदत दि. १०/०६/२०२५ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत** आहे.

सदरची प्रतिनियुक्ती मुलाखत व गुणवत्तेच्या आधारे करण्यात येणार आहे. **मुलाखतीसाठी दि. १३/०६/२०२५ रोजी शासकीय विदयानिकेतन पुसेगाव, ता. खटाव, जि. सातारा येथे स्वखर्चाने उपस्थित रहावे.** यासाठी कोणताही दैनिक भत्ता अथवा प्रवास भत्ता दिला जाणार नाही.

तरी याबाबतचे परिपत्रक आपल्या जिल्हयातील/कार्यक्षेत्रातील सर्व कार्यरत जिल्हा परिषद शिक्षक/म.न.पा./न.पा. शिक्षण मंडळाकडील शिक्षक यांचे निदर्शनास आणण्यात यावे. तसेच मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व मा. आयुक्त, महानगरपालिका, मुख्याधिकारी नगरपालिका/नगरपरिषद यांचे अवलोकनी आणावे.

( महेश ज. चोथे )
शिक्षण उपसंचालक,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

https://forms.gle/CdshCuhSKL4fDJkP6

प्रत- मा. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांना माहितीस्तव सादर.
प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
**मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कोल्हापूर सांगली सातारा रत्नागिरी सिंधुदुर्ग**
**मा. आयुक्त, महानगरपालिका कोल्हापूर/सांगली-मिरज-कुपवाड/इचलकरंजी**
**मुख्याधिकारी, नगरपालिका /नगरपरिषद कोल्हापूर/ सांगली /सातारा /रत्नागिरी/ सिंधुदुर्ग**

E:\D\Backup Ddb 20-7-2017\Ddb\Pusegaon Meeting 13.2.2015 (Autosaved).Docx-95

Scanned with OKEN Scanner